# **Prison Agriculture**

In Maharashtra state, 29 prisons have 821.50 hectares land area, out of which **328.88** hectares area (40.03%) is agricultural land. Of the available agricultural land, nearly 57% i.e. 186.52 hectares land is under irrigation, while remaining 142.36 hectares land is rain fed. Trees like teak, bamboo, tamarind, mango, banayan, pimple, jamun, karanj, neem, rain tree etc. are planted in the forest area. Area under forest tree plantation is 180.77 hectares and 81.06 hectares is barren land. The non-agricultural land measuring to 230.79 hectares is for Prisons, Office buildings, officers/staff quarters, internal roads, playgrounds etc.

On the Agricultural land of prisons, daily-required fruits, leafy vegetables and food grains such as paddy, wheat, sorghum, tur, soybean, etc. are produced in Kharif, Rabi and summer seasons. Dairy and fishery are also developed in some of the Jails. Sugarcane crop is grown in Visapur, Kolhapur and Paithan jail. During the year 2018-19, in all **810 male** prisoners and **51 female** prisoners were engaged in agricultural work daily.

In Yerawada Open District Jail, Tissue culture banana variety viz. G-9 are on 2 acres of land. In Paithan, Yerawada open jail and Buldhana jail, seed production programme of Wheat, Jawar, Soybean and Pigeon pea was undertaken successfully with the help of Maharashtra State Seed Corporation (MAHABIJ), during Kharif and Rabi season.

In the year 2018-19, income generated from agriculture in prisons was Rs. 4.09 crores, as against the expenditure of Rs. 2.44 crores, resulting in net profit of Rs.1.65 crores. On the basis of income generated from the agriculture during the year 2018-19, the efforts taken by Paithan & Visapur Open Jail were worth noteworthy.

In order to provide income to prisoners through self employment and gain experience besides fruits, vegetables and food grains production, the Jails have developed nurseries as an agricultural allied activity. In few Jails, activities like fisheries, vermin-compost etc. are implemented as additional income sources. Mushroom production Project of worth Rs. 20Lakhs is implemented at Yerawada jail with the help of Agricultural Department through National Horticultural Mission **(NHM)**. Mushroom production projected capacity will be 12 to 15 Mts. per annum.

With the joint venture of Municipal Corporation Pune and Jail authorities, a Biogas Plant of worth Rs. 90lakhs is also implemented at Yerwada Central Prison. Bio-gas unit will generate 140 Kg. Gas per day, which will save approx. Rs. 3 Lac per month. Extracted slurry of this unit will be utilized as organic manure.

Recently units of Goat Farming have been started at Yerwada, Visapur & Atapadi, Paithan, Nashikroad, Morshi, Gadchiroli Open Prison & in Bhandara, Buldhana Dist . Jail.

In 2007-08, from the funds of National Board for Medicinal and Aromatic Plants was brought under ***Sita Ashok*** medicinal plantation Similarly, in 2008-09, and during month of August 2011, massive plantation of ***chandan*** trees was under taken in 10 jails. For maintenance and security purpose, the plantation was carried out inside the compound walls of the jail.

Under Farm Mechanization Scheme for Jails Administrative approval of Rs. 17.42 Lakh received and utilized for purchase of Trolley &Farm equipments for agricultural land in jail.

Agriculture is being mainly used as a method to reform & rehabilitate convicts. Besides keeping them gainfully employed during their confinement, convicts gain knowledge & experience which they can use once they get released.

# Prison Agriculture Production (Rs. Cr.)

| Sr.No. | Financial Year | Amount of Produce | Expenditure | Profit |
|---|---|---|---|---|
| 1. | 2009-10 | 1.78 | 0.70 | 1.08 |
| 2. | 2010-11 | 1.72 | 0.91 | 0.81 |
| 3. | 2011-12 | 1.78 | 1.15 | 0.63 |
| 4. | 2012-13 | 2.17 | 1.07 | 1.10 |
| 5. | 2013-14 | 2.54 | 1.14 | 1.40 |
| 6. | 2014-15 | 3.34 | 1.63 | 1.71 |
| 7. | 2015-16 | 3.64 | 1.60 | 2.04 |
| 8. | 2016-17 | 3.48 | 1.73 | 1.75 |
| 9. | 2017-18 | 3.86 | 2.27 | 1.59 |
| 10. | 2018-19 | 4.09 | 2.44 | 1.65 |

**Note :- Wages rates increased since Sept. 2010 & Aug. 2014,Aug 2017**

## कारागृह शेती विभाग

महाराष्ट्र राज्यातील शेतीक्षेत्र असलेल्या २९ कारागृहांमध्ये एकूण ८२१.५० हेक्टर जमीन आहे. त्यापैकी एकूण शेती उपयोगी क्षेत्र ३२८.८८ हेक्टर आहे. या क्षेत्रापैकी १८६.५२ हेक्टर क्षेत्र बागायत व १४२.३६ हेक्टर क्षेत्र जिरायत आहे. तसेच वनीकरणाखालील १८०.७७ हेक्टर तर पडिक क्षेत्र ८१.०६ हेक्टर असून उर्वरीत २३०.७९ हेक्टर क्षेत्रा मध्ये कारागृह इमारती, कर्मचारी/अधिकारी निवासस्थाने,अंतर्गत रस्ते, विविध कार्यालये, मैदाने, बाजार पेठ, स्मशान भुमी, वायु सेनेस करारावर दिलेल्या जमीनी, महानगरपालिकेस रस्ता रुंदी करणासाठी, सामाजिक न्याय विभागास दिलेल्या क्षेत्राचा समावेश आहे.

कारागृह बंद्यांना दैनंदीन आहारासाठी लागणारा भाजीपाला, अन्नधान्य हे उपरोक्त क्षेत्रावर उत्पादीत केले जाते. या क्षेत्रा मध्ये खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात विविध प्रकारच्या फळभाज्या, पालेभाज्या, भात, गहू, ज्वारी, तुर, सोयाबीन, टिश्यु केळी व इतर पिके यांचे उत्पादन घेण्यात येते. तसेच काही कारागृहामध्ये दुध व मासे यांचे देखील उत्पादन घेतले जाते विसापूर, कोल्हापुर व पैठण कारागृहाचे शेती क्षेत्रावर ऊसाचे उत्पादन घेण्यात येत आहे. सन २०१८-१९ या वर्षामध्ये कारागृह शेती वरती ८१० पुरुष बंदी व ५१ महिला बंदयांना दररोज कारागृह शेतीमध्ये काम मिळालेले आहे.

येरवडा खुले जिल्हा कारागृह प्रक्षेत्रावरील २ एकर क्षेत्रावर उतीसंवर्धीत जी-९ या वाणाची खोडवा केळी लागवड आहे. तसेच मागील रब्बी हंगामात नाशिकरोड, पैठण व येरवडा खुले कारागृहाच्या प्रक्षेत्रावर महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबिज) यांचे मार्फत ज्वारी व गहू, तुर बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आला आहे.

सन २०१८-१९ मध्ये कारागृहातील शेती मध्ये रुपये ४.०९ कोटी रक्कमेचे उत्पादन मिळाले आहे. त्यासाठी रुपये २.४४ कोटी खर्च झाला असुन रुपये १.६५ कोटी निव्वळ फायदा झाला आहे. शेती उत्पन्नाच्या आधारित सन २०१८-१९ मध्ये खुले कारागृह पैठण यांचा प्रथम क्रमांक, विसापूर खु.का. व्दितीय क्रमांक तर नाशिकरोड खु. का.ने तृतीय क्रमांक मिळविला आहे.

बंद्यांना रोजगाराव्दारे कमाई होण्यासाठी व त्यांचे पुर्नवसनासाठी अनुभव मिळावा या दृष्टिने कारागृह विभागाने फळभाजी, पालेभाजी, अन्नधान्य उत्पादना व्यतिरीक्त राज्यातील कारागृहात रोपवाटीका विकसित केल्या आहेत. काही कारागृहात मत्सपालन उद्योग, मशरुम उत्पादन युनिट विकसित करण्यात आले आहे. काही कारागृहात गांडूळ खत निर्मिती प्रकल्प कार्यान्वीत आहेत.

कृषी विभागामार्फत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत येरवडा येथे १०० टक्के अनुदानातुन रु. २० लक्ष रक्कमेतुन अळींबी उत्पादन प्रकल्प उभारण्यात आला असुन त्याची अपेक्षित वार्षीक अळींबी उत्पादन क्षमता १२ ते १५ टन इतकी आहे.तसेच म.न.पा. पुणे यांचे संयुक्त विद्यमाने अंदाजित रु. ९० लक्ष रक्कमेतुन बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला असुन सदर प्रकल्पातुन प्रतिदिन १४० किलो गॅस उत्पादित होऊन दरमहा अंदाजित रु. ३ लक्ष  खर्चात बचत होईल व प्रकल्पातुन बाहेर पडणा-या निच-यापासून सेंद्रीय खत तयार होत आहे.

राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, नवी दिल्ली यांचे अनुदानातुन सन २००७-०८ या वर्षात येरवडा खुले जिल्हा कारागृह,पुणे येथे सिता अशोक या औषधी वनस्पतीची लागवड करण्यात आली आहे. तसेच येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे सन २००८-०९ व माहे ऑगस्ट-२०११ मध्ये राज्यातील इतर १० कारागृहांमध्ये राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, नवी दिल्ली यांचे अनुदानातुन चंदन या सुगंधी वनस्पतीच्या लागवडीचा कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. चंदन वृक्षाचे संगोपनाच्या दृष्टीने सदर लागवड ही कारागृहाच्या चार भिंतीच्या आतमधील उपलब्ध जागेत करण्यात आली आहे.

वार्षिक योजना सन २०१८-१९ कारागृह शेतीचे आधुनिकीकरण करणे या योजने अंतर्गत **रुपये १७.४२ लक्ष** इतका  निधी कारागृह शेतीकरीता ट्रॉली व औजारे खरेदीसाठी खर्च केला आहे.

**कारागृह शेती विभाग वर्षनिहाय उत्पादन खर्च आढावा. (रु.कोटी)**

| अ.क्र. | वर्ष | उत्पादन | खर्च | नफा |
|---|---|---|---|---|
| १. | २००९-१० | १.७८ | ०.७० | १.०८ |
| २. | २०१०-११ | १.७२ | ०.९१ | ०.८१ |
| ३. | २०११-१२ | १.७८ | १.१५ | ०.६३ |
| ४. | २०१२-१३ | २.१७ | १.०७ | १.१० |
| ५. | २०१३-१४ | २.५४ | १.१४ | १.४० |
| ६. | २०१४-१५ | ३.३४ | १.६३ | १.७१ |
| ७. | २०१५-१६ | ३.६४ | १.६० | २.०४ |
| ८. | २०१६-१७ | ३.४८ | १.७३ | १.७५ |
| ९. | २०१७-१८ | ३.८६ | २.२७ | १.५९ |
| १०. | २०१८-१९ | ४.०९ | २.४४ | १.६५ |

**टीप :- माहे सप्टें. २०१० व ऑगस्ट २०१४, ऑगस्ट २०१७  पासून बंदी मजुरी  दरवाढ**